**S.N.D.T. Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
New Marine Lines, Churchgate,
MUMBAI - 400 020.

Phone : + 91 22 2203 1879
Fax : + 91 22 2201 6226

A- Grade (CGPA 3.08)

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग, न्यु मरिन लाईन,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

Telegram : UNIWOMEN
Website : sndt.ac.in

ऑफि.जन.१/ २०२४-२५/1239

०७ ऑक्टोबर, २०२४.

# परिपत्रक

**विषय : व्यवस्थापनेचे हस्तांतरण कार्यपध्दती (अधिसूचना).**

**संदर्भ : अधिसूचना दि. १५/१२/२०२२**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ११९ मध्ये व्यवस्थापनाचे हस्तांतरण याबाबत माहिती देण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मुंबई, यांनी दिनांक १५ डिसेंबर, २०२२ रोजी महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या व्यवस्थापनाचे हस्तांतरण करण्यासाठी परवानगी देण्याच्या कार्यपध्दतीशी संबंधीत असणारी अधिसुचना निर्गमीत केली आहे.

सोबत जोडलेल्या अधिसुचनेचे अवलोकन करावे. अधिसुचनेमध्ये विहित केलेल्या नियमांनुसार पात्र संस्थेने ज्या वर्षात व्यवस्थापनाचे हस्तांतरण करावयाचे आहे, अश्या संस्थांनी नमुना क्रं. १ व २ नुसार अर्ज व आवश्यक दस्ताऐवज व विहित शुल्कासह संलग्न्ता विभागाकडे दिनांक २५/१०/२०२४ पर्यंत अर्ज दाखल करावेत.

व्यवस्थापनेचे हस्तांतरण या प्रस्तावाकरीता शुल्क २७,५००/- (रू. सत्तावीस हजार पाचशे मात्र) राहील, याची नोंद घ्यावी.

07/10/2024

**(डॉ. हिम्मत जाधव)**
अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा
संलग्नता विभाग (अति.भार)

प्रत: १.प्र-कुलगुरू कार्यालय, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, मुंबई
२.कुलसचिव कार्यालय, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, मुंबई
३.श्री. निलेश कासले, एज्युकेशन टेक्नॉलॉजी, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, जुहू (सदर परीपत्रक जोडपत्रे विद्यापीठाच्या वेबसाईटवर, संलग्नता विभागाअंतर्गत प्रसिध्द करावे.)
४.समन्वयक, मे.निर्मल सॉफ्टवेअर सर्व्हिसेस प्रा.लि, नागपूर, (सदर परिपत्रक जोडपत्रे ॲफिलेशन ऑनलाईन पोर्टलवर प्रसिध्द करावे.)

**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai 400 020
Phone: +91 22 2203 1879
Fax: +91 22 2201 8226

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग
मुंबई ४०० ०२०
Telegram: UNIWOMEN
Website: sndt.ac.in

ॲफि.जन.१/ २०२३–२४/६५३

०७ जून, २०२३.

## परिपत्रक

**विषय : व्यवस्थापनेचे हस्तांतरण कार्यपध्दती (अधिसूचना).**

**संदर्भ : अधिसूचना दि. १५/१२/२०२२**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ११९ मध्ये व्यवस्थापनाचे हस्तांतरण याबाबत माहिती देण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासन , उच्च व तंत्र शिक्षण विभाग मुंबई, यांनी दिनांक १५ डिसेंबर, २०२२ रोजी महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या व्यवस्थापनाचे हस्तांतरण करण्यासाठी परवानगी देण्याच्या कार्यपध्दतीशी संबंधीत असणारे परिनियम विहीत केले आहे.

सोबत जोडलेल्या अधिसुचनेचे अवलोकन करावे. अधिसुचनेमध्ये विहित केलेल्या नियमांनूसार पात्र संस्थेने ज्या वर्षात व्यवस्थापनाचे हस्तांतरण करावयाचे आहे त्या वर्षाच्या **सप्टेंबरच्या शेवटच्या दिवसापूर्वी** अर्जासह व कागदपत्रांसह विद्यापीठाच्या संलग्नता विभागाकडे अर्ज सादर करावा.

हस्तांतरण शुल्क हे प्रथम वर्षी २५,०००/– (रू. पंचवीस हजार) राहील व या वर्षानंतर **दरवर्षी १०% नी वाढविण्यात येईल.**

(Signature) 12/6/23

(प्रो. मेधा तापिआवाला)
अधिष्ठाता, मानवताविज्ञान विद्याशाखा
संलग्नता विभाग (अति.भार)

प्रत: १.प्र–कुलगुरू कार्यालय, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, मुंबई
२.कुलसचिव कार्यालय, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, मुंबई
३.श्री. निलेश कासले, एज्युकेशन टेक्नॉलॉजी, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, जुहू (सदर परीपत्रक जोडपत्रे विद्यापीठाच्या वेबसाईटवर, संलग्नता विभागाअंतर्गत प्रसिध्द करावे.)
४.समन्वयक, मे.निर्मल सॉफ्टवेअर सर्व्हिसेस प्रा.लि, नागपूर, (सदर परिपत्रक जोडपत्रे ॲफिलेशन ऑनलाईन पोर्टलवर प्रसिध्द करावे.)

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक १५५(२)] गुरुवार, डिसेंबर १५, २०२२/अग्रहायण २४, शके १९४४ [पृष्ठे ९, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ४७२

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ डिसेंबर २०२२.

### अधिसूचना

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ, अधिनियम, २०१६.**

क्रमांक एसटीए-२०१८/प्र.क्र.९१/विशि-२.—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ६) याच्या कलम ७१ च्या पोट-कलम (१६) तसेच कलम ७२ च्या पोट-कलम (२) च्या खंड अधिनियम, (१०) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या व्यवस्थापनाचे हस्तांतरण करण्यासाठी परवानगी देण्याच्या कार्यपद्धतीशी संबंधित असणारे पुढील परिनियम विहित करीत आहे :—

### सन २०२२ चे एकरूप परिनियम क्रमांक - १

**१. संक्षिप्त नाव.**—या परिनियमांस, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या व्यवस्थापनाचे हस्तांतरण करण्यासाठी परवानगी देण्याची कार्यपद्धती) एकरूप परिनियम, २०२२ असे म्हणावे.

**२. व्यवस्थापनाचे हस्तांतरण करण्यासाठी परवानगी देताना अनुसरावयाची कार्यपद्धती—**

(१) कोणत्याही संलग्न महाविद्यालयाचे किंवा परिसंस्थेचे विद्यमान व्यवस्थापन, कोणत्याही संलग्न महाविद्यालयाच्या किंवा यथास्थिति, मान्यताप्रोप्त परिसंस्थेच्या व्यवस्थापनाचे हस्तांतरण करण्यासाठी परवानगी देण्याकरिता ज्या वर्षात व्यवस्थापनाचे हस्तांतरण करण्याची मागणी केली आहे त्या वर्षाच्या पूर्ववर्ती वर्षाच्या सप्टेंबरच्या शेवटच्या दिवसापूर्वी विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर करील.

**(२) विद्यमान व्यवस्थापन, यासोबत जोडलेल्या नमुन्यात व्यवस्थापनाचे हस्तांतरण करण्याचा प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करील आणि त्यासोबत पुढील गोष्टी सादर करीलः—**

(एक) खंड (५) च्या उप-खंड (एक) ते (पाच) मध्ये नमूद केलेली सविस्तर माहिती व दस्तऐवज.

(दोन) रुपये २५०००/- इतके शुल्क हे परिनियम ज्या वर्षात **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केले आहेत त्या वर्षानंतर दरवर्षी दहा टक्क्यांनी वाढवण्यात येईल.

(तीन) विद्यमान व्यवस्थापनाने, पुढील बाबीसंबंधी नवीन व्यवस्थापनाला सर्व माहिती पूरवील अशा आशयाचे हमीपत्रः—

(क) विविध पाठ्यक्रमांना प्रवेश दिलेले विद्यार्थी, निकाल घोषित करणे, शुल्क, इत्यादी;

(ख) अध्यापक व अध्यापकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती आणि इतर सेवा लाभ या विषयीच्या माहितीसह त्यांचा तपशील;

(ग) पायाभूत सुविधा, ग्रंथ, साधनसामग्री, जंगम व स्थावर मालमत्ता, बँक खाते, लेखापरीक्षा अहवाल, इत्यादींचा तपशील;

(घ) विद्यापीठाकडून विहित करण्यात येतील असे इतर दस्तऐवज.

(३) व्यवस्थापनाचे हस्तांतरण करण्यासाठी परस्पर प्रस्ताव प्राप्त झाल्यावर, विद्यापीठ, संबंधित हितसंबंधित व्यक्तींकडून हरकती व सूचना मागवणारी जाहिरात दोन स्थानिक मराठी वृत्तपत्रांमध्ये आणि एका राज्यस्तरीय मराठी वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध करील.

(४) विद्यमान व्यवस्थापनाकडून आणि नवीन व्यवस्थापनाकडून अशा प्रकारे प्राप्त झालेल्या आणि त्यांच्या सर्व सदस्यांनी यथोचितरीत्या स्वाक्षरी केलेल्या प्रस्तावांची अधिष्ठाता मंडळाकडून छाननी करण्यात येईल आणि व्यवस्थापन परिषदेस तिच्या विचारार्थ व मान्यतेसाठी पाठवण्यात येईल.

(५) विद्यापीठाची व्यवस्थापन परिषद, त्यावर विचार करील आणि राज्य शासनाकडे शिफारस करील. जे प्रस्ताव पुढील शर्तींची पूर्तता करतात अशा नवीन व्यवस्थापनाच्या प्रस्तावांचीच शिफारस करण्यात येईलः—

(एक) विद्यमान व्यवस्थापनाचे संलग्न महाविद्यालय, किंवा यथास्थिति, मान्यताप्राप्त परिसंस्था ताब्यात घेण्यासाठी आवश्यक असलेल्या शासनाकडून आणि विद्यापीठाकडून वेळोवेळी विहित करण्यात येतील अशा पायाभूत सुविधा नवीन व्यवस्थापनाकडे आहे.

(दोन) एकतर विद्यमान व्यवस्थापनाचा किंवा नवीन व्यवस्थापनाचा कोणताही विवाद न्यायालयाकडे किंवा धर्मादाय आयुक्ताच्या न्यायालयाकडे प्रलंबित नाही.

(तीन) उप-खंड (७) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सक्षम प्राधिकरणाची पूर्व मान्यता आवश्यक आहे.

(चार) नवीन व्यवस्थापनाची वित्तीय स्थिती मजबूत आहे आणि विद्यमान व्यवस्थापनाचे संलग्न महाविद्यालय, किंवा यथास्थिति, मान्यताप्राप्त परिसंस्था ताब्यात घेण्यासाठी शासनाकडून व विद्यापीठाकडून वेळोवेळी विहित करण्यात येतील असे वित्तीय साधनसंपत्तीचे निकष त्याने पूर्ण केले आहे.

(पाच) शासनाने व विद्यापीठाने वेळोवेळी विहित केल्याप्रमाणे विद्यमान व्यवस्थापन ताब्यात घेण्यासाठी आवश्यक असलेल्या इतर कोणत्याही शर्ती.

(६) विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने शिफारस केलेले प्रस्ताव, राज्य शासनाकडे विचारार्थ सादर करण्यात येतील आणि राज्य शासनाचा निर्णय प्राप्त झाल्यावर, विद्यापीठ, असा निर्णय प्राप्त झाल्यापासून आठ दिवसांच्या आत विद्यमान व्यवस्थापनाला व विद्यापीठास नवीन व्यवस्थापनाला तो निर्णय कळवील.

(७) व्यवस्थापनाचे हस्तांतरण करण्यासाठी परवानगी देण्याबावत विद्यापीठाकडून पत्रव्यवहार प्राप्त झाल्यावर, पूर्वीचे व्यवस्थापन व विद्यमान व्यवस्थापन, समुचित कायद्यान्वये व्यवस्थापनाचे हस्तांतरण करण्यासाठी सक्षम प्राधिकरणांची परवानगी घेण्याकरिता यथोचित उपाययोजना करतील.

**स्पष्टीकरण**.—या खंडाच्या प्रयोजनार्थ "सक्षम प्राधिकरण" याचा अर्थ.—

(एक) जर व्यवस्थापन हे, नोंदणीकृत विश्वस्त व्यवस्था असेल तर, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त मंडळ अधिनियम (सन १९५० चा २९) खालील सक्षम प्राधिकरण असा आहे; किंवा

(दोन) जर व्यवस्थापन हे, नोंदणीकृत सोसायटी असेल तर सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) खालील सक्षम प्राधिकरण, असा आहे; किंवा

(तीन) जर व्यवस्थापन हे, नोंदणीकृत कंपनी असेल तर, कंपनी अधिनियम, २०१३ (२०१३ चा १८) खालील सक्षम प्राधिकरण, असा आहे.

(८) समुचित कायद्यान्वये व्यवस्थापनाचे हस्तांतरण करण्यासाठी सक्षम प्राधिकरणाची परवानगी प्राप्त झाल्यावर, नवीन व्यवस्थापन, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा.६) याच्या कलम १०८ अन्वये विहित केलेल्या हमीपत्रासह अशा परवानगीची प्रत, अशी परवानगी प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून आठ दिवसांच्या आत, विद्यापीठास सादर करील. सक्षम प्राधिकरणाच्या अशा परवानगीची प्रत, नवीन व्यवस्थापनाकडून राज्य शासनाला पाठवण्यात येईल.

(९) वरील खंडामध्ये विहित केलेली व्यवस्थापनाच्या हस्तांतरणाची संपूर्ण प्रक्रिया नवीन व्यवस्थापनाकडून विद्यमान व्यवस्थापन ज्यावर्षी ताब्यात घेण्याचे प्रस्तावित केले आहे त्या वर्षाच्या १५ जून रोजी किंवा त्यापूर्वी पूर्ण करण्यात येईल. जर अशी प्रक्रिया या मुदतीत पूर्ण केली नसेल तर, विद्यापीठाकडून व्यवस्थापनाचे हस्तांतरण केवळ पुढील वर्षामध्ये अंमलात आणण्यात येईल.

(१०) व्यवस्थापनाच्या हस्तांतरणानंतर, विद्यमान व्यवस्थापन, नवीन व्यवस्थापनाला अशी हमी देईल की, विद्यमान व्यवस्थापनाचा नवीन व्यवस्थापनावर कोणताही हक्क किंवा प्राधिकार असणार नाही. अशा हमीपत्राची प्रत, विद्यापीठाला व राज्य शासनाला देखील सादर करण्यात येईल.

(११) नवीन व्यवस्थापन, विद्यापीठाला व राज्य शासनास त्याचे असे हमीपत्र सादर करील की, त्याने ताब्यात घेतलेल्या महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या व्यवस्थापनासाठी सर्वस्वी तेच जबाबदार असेल.

(१२) विद्यमान व्यवस्थापनाच्या नियामक मंडळाचे किंवा मंडळाचे सदस्य, विश्वस्त, संचालक व समित्या यांना नवीन व्यवस्थापनाच्या कामकाजामध्ये कोणताही हक्क असणार नाही.

(१३) नवीन व्यवस्थापन, त्याच्याकडे हस्तांतरित केलेले महाविद्यालय किंवा परिसंस्था, शासनाने, संबंधित नियामक मंडळाने व विद्यापीठाने वेळोवेळी विहित केलेल्या मानकांनुसार चालवील.

(१४) नवीन व्यवस्थापनावर पुढील आबंधन असतील:-

(एक) संलग्न महाविद्यालयाचे किंवा यथास्थिती मान्यता प्राप्त परिसंस्थेचे व्यवस्थापन ताब्यात घेतल्यानंतर, संलग्न महाविद्यालयातील, किंवा यथास्थिती, मान्यताप्राप्त परिसंस्थेतील अध्यापक व अध्यापकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवांचे संरक्षण करणे.

(दोन) संलग्न महाविद्यालयाचे किंवा यथास्थिती, मान्यताप्राप्त परिसंस्थेचे व्यवस्थापन ताब्यात घेतल्यानंतर संलग्न महाविद्यालयातील किंवा यथास्थिती मान्यताप्राप्त परिसंस्थेतील विविध पाठ्यक्रमांना प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचे संरक्षण करणे.

## नमुना

[खंड २ (२) पहा]

( *व्यवस्थापनाचे हस्तांतरण करण्याच्या प्रस्तावाचा नमुना)

### नमुना क्रमांक - एक

| अनुक्रमांक | बाब | तपशील |
|---|---|---|
| १. | व्यवस्थापनाचे नाव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक | |
| २. | व्यवस्थापनाचा नोंदणी क्रमांक व नोंदणी दिनांक | |
| ३. | ज्या संलग्न महाविद्यालयाच्या मान्यताप्राप्त / परिसंस्थेच्या व्यवस्थापनाचे हस्तांतरण करण्याची मागणी केली आहे त्या संलग्न महाविद्यालयाचे / मान्यताप्राप्त परिसंस्थेचे नाव (नावे) | |
| ४. | ज्या शैक्षणिक वर्षापासून व्यवस्थापनाचे हस्तांतरण करण्याची मागणी केली आहे ते शैक्षणिक वर्ष | |
| ५. | विद्यमान विद्याशाखा, पाठ्यक्रम, विषय व तुकड्या | |
| ६. | प्रत्येक विद्याशाखेअंतर्गत प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची वर्षनिहाय संख्या | |

| | | |
|---|---|---|
| ७. | विद्यमान पायाभूत सुविधा, ज्यात संख्या, क्षेत्रफळ व इतर आवश्यक विनिर्देशने, कोणतीही असल्यास, यांसह वर्गखोल्या, कार्यालय, प्रयोगशाळा ग्रंथालय, क्रीडा सुविधा, इत्यादींचा समावेश आहे. | |
| ८. | ज्याच्या व्यवस्थापनाच्या हस्तांतरणाची मागणी केली आहे त्या संलग्न महाविद्यालयाची/मान्यताप्राप्त परिसंस्थेची मागील तीन वित्तीय वर्षांच्या लेखापरीक्षा अहवालासह वित्तीय स्थिती. | |
| | (क) जंगम मालमत्ता | |
| | (ख) स्थावर मालमत्ता | |
| | (ग) बँकेतील ठेवी | |
| | (घ) कर्ज | |
| ९. | संलग्न महाविद्यालयाच्या/मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या व्यवस्थापनाच्या हस्तांतरणाचे समर्थन | |
| १०. | कोणत्याही न्यायालयासमोर / प्राधिकरणासमोर प्रलंबित असलेल्या विवादांची त्यांच्या तपशिलासह संख्या. | |
| ११. | संलग्न महाविद्यालयाच्या/मान्यता प्राप्त परिसंस्थेच्या व्यवस्थापनाच्या हस्तांतरणासंबंधी व्यवस्थापनाने मंजूर केलेल्या ठरावाचा क्रमांक व दिनांक. | |

अध्यक्ष

नाव :

शिक्का

सचिव

नाव :

शिक्का

## नमुना क्रमांक - दोन

| अनुक्रमांक | बाब | तपशील |
|---|---|---|
| १. | व्यवस्थापनाचे नाव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक | |
| २. | व्यवस्थापनाचा नोंदणी क्रमांक व नोंदणी दिनांक | |
| ३. | व्यवस्थापनाच्या विद्यमान संलग्न महाविद्यालयाचे/मान्यताप्राप्त परिसंस्थेचे नाव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक, | |
| ४. | ज्या वर्षापासून व्यवस्थापनाचे हस्तांतरण करण्याची मागणी केली आहे ते वर्ष | |
| ५. | विद्यमान विद्याशाखा, पाठ्यक्रम, विषय व तुकड्या | |
| ६. | प्रत्येक विद्याशाख्यांतर्गत पाठ्यक्रमांना प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची वर्षनिहाय संख्या | |
| ७. | (अ) विद्यमान पायाभूत सुविधा – ज्यामध्ये संख्या, क्षेत्रफळ व इतर आवश्यक विनिर्देशने, कोणतीही असल्यास, वर्ग कार्यालय, प्रयोगशाळा, ग्रंथालय, क्रीडा सुविधा, इत्यादींचा समावेश आहे. | |
| | (ब) अतिरिक्त पायाभूत सुविधा – त्यांची संख्या, क्षेत्रफळ व इतर विनिर्देशने, कोणतीही असल्यास, यांसारख्या तपशिलासह ताब्यात घ्यावयाच्या संलग्न महाविद्यालयाचे/ मान्यताप्राप्त परिसंस्थेचे विद्यार्थी, अध्यापक व इतर कर्मचारी यांची निवास व्यवस्था. | |
| ८. | विद्यमान (संलग्न) महाविद्यालयाची/मान्यता प्राप्त परिसंस्थेची, मागील तीन वर्षातील लेखापरीक्षा अहवालांसह वित्तीय स्थिती. | |
| | (क) जंगम मालमत्ता | |
| | (ख) स्थावर मालमत्ता | |
| | (ग) बँकेतील ठेवी | |
| | (घ) कर्ज | |

| | | |
|---|---|---|
| ९. | संलग्न महाविद्यालयाच्या/मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या व्यवस्थापनाच्या हस्तांतरणासाठी विद्यापीठाला प्रदान केलेल्या शुल्कांचा तपशील, | |
| १०. | संलग्न महाविद्यालयाचे/मान्यताप्राप्त परिसंस्थेचे व्यवस्थापन ताब्यात घेण्याचे समर्थन | |
| ११. | कोणत्याही न्यायालयासमोर / प्राधिकरणासमोर प्रलंबित असलेल्या विवादांची त्यांच्या तपशिलासह संख्या | |
| १२. | इतर व्यवस्थापनाकडून चालवले जाणारे संलग्न महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था ताब्यात घेण्यासाठी व्यवस्थापनाने मंजूर केलेल्या ठरावाचा क्रमांक व दिनांक | |

अध्यक्ष

नाव :

शिक्का

सचिव

नाव :

शिक्का

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अजित बाविस्कर,**
शासनाचे उप सचिव.

## HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 15th December, 2022.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

No. STA-2018/CR-91/UE-2.—In exercise of the powers conferred by clause (10) of sub-section (*2*) of section 72 read with sub-section (*16*) of section 71 of the Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah. VI of 2017), the Government of Maharashtra hereby, prescribes the following uniform Statutes, relating to procedure for permission to transfer of Management of college or institution, namely:—

## UNIFORM STATUTES NO. 01 OF 2022

**1. Short title.**—This Statutes may be called the Maharashtra Public Universities (Procedure for Permission to Transfer of Management of college or institution) Uniform Statutes, 2022.

**2. Procedure to be followed while granting permission for transfer of Management.—**

(*1*) The existing management of any affiliated college or recognized institution shall submit a proposal to the university to grant a permission to transfer the management of any affiliated college or recognized institution, as the case may be before the last day of the September of the year, preceding the year in which transfer of management is sought.

(*2*) The existing management shall submit a proposal for transfer of management to the university in the form amended hereto and it shall be accompanied with the following namely :—

(*i*) Detail as information and documents mentioned in sub-clauses (*i*) *to* (*iv*) of clause (5) ;

(*ii*) Fees of Rs. 25,000, for the year in which these statutes are published in the *Official Gazette* which shall be increased by ten percent. every year there after :

(*iii*) An Undertaking to the effect that the existing management shall provide all information to the new management regarding the following namely :—

(*a*) Students admitted to various courses, declaration of results, fees, etc.;

(*b*) Details of teaching and non-teaching staff along with information about their terms and conditions of service and other service benefits;

(*c*) Details of infrastructure, books, equipment, movable and immovable properties, bank accounts, audit report, etc.;

(*d*) Other documents as may be prescribed by the University.

(*3*) On receipt of mutual proposal for transfer of Management, the University shall publish an advertisement in two local Marathi newspapers and one state level Marathi newspaper calling for objections and suggestions from concerned stakeholders.

(*4*) The proposals so received and duly signed by all members from the existing management and new management shall be scrutinized by the Board of Deans and shall be forwarded to the Management Council for its consideration and approval.

(*5*) The Management Council of the University shall consider and recommend to the State Government. Only those proposals of new management complying with the following requirements namely:—

(*i*) The new management has necessary infrastructure as may be prescribed by the State Government and the university from time to time, required for taking over the affiliated college or recognized institution, as the case may be, of the existing management;

(*ii*) there is no dispute pending in the Court of Law or Court of Charity Commissioner either of the existing management or of the new management;

(*iii*) Pre approval of competent authority specified in sub clause (7) is necessary;

(*iv*) the new management has sound financial capacity and fulfils criteria of financial

resources, as may be prescribed by the State Government and the University from time to time, to take over the affiliated college or recognized institution, as the case may be, of the existing management;

(*v*) any other requirements necessary for taking over the existing management, as prescribed by the State Government and University, from time to time.

(*6*) The proposals recommended by Management council of the University shall be submitted for consideration to the State Government and on receipt of the decision of the State Government, the university shall communicate the same to the existing management and the new management within eight days of receipt of such decision by the University.

(*7*) On receipt of the communication from the university regarding grant of permission to transfer of management, the previous management and the new management shall take appropriate steps to obtain the permission of the competent authorities for transfer of management under the appropriate law.

*Explanation*.— 'Competent Authority' for the purposes of this clause shall mean,—

(*i*) the Competent Authority under the Maharashtra Public Trusts Act, (XXIX 1950), if the management is a registered trust ; or

(*ii*) the Competent Authority under the Societies Registration Act, 1860 (21 of 1860) if the management is a registered society ; or

(*iii*) the Competent Authority under the Companies Act, 2013 (18 of 2013) if the management is a registered company.

(*8*) On receipt of the permission of the Competent Authority for transfer of management under the appropriate law, the new management shall submit a copy of such permission along with the undertaking as prescribed under section 108 of the Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah. VI of 2017) to the university, within eight days from the date of receipt of such permission. A copy of such permission of the Competent Authority shall be sent by the new management to the State Government.

(*9*) The entire process of transfer of management prescribed in the above clauses, shall be completed on or before the 15th June of the year in which the existing management is proposed to be taken over by the new management. If such process is not completed within this time limit, the transfer of management shall be given effect to by the university only in the subsequent academic year.

(*10*) After the transfer of management, the existing management shall give an undertaking to the new management that the existing management shall not have any right or authority over the new management. A copy of such undertaking shall also be submitted to the university and the State Government.

(*11*) The new management shall submit its undertaking to the university and the State Government that it shall be solely responsible for management of the college or institution taken over by it.

(*12*) Members of Governing Body or Board, trustees, directors and committees of the existing management shall not have any right in the functioning of the new management.

(*13*) The new management shall run the college or institution transferred to it, as per the norms prescribed by the State Government, concerned Regulatory Bodies and the University, from time to time.

(*14*) It shall be obligatory upon the new management :—

(*i*) to protect the services of teaching and non-teaching staff in the affiliated college or recognized institution, as the case may be, after taking over the management of affiliated college or recognized institution, as the case may be,

(*ii*) to protect the academic interest of the students admitted to various courses in the affiliated colleges or recognized institution, as the case be, after taking over the management of the affiliated college or recognized institution, as the case may be.

## Form

(*See* clause 2 (2))

(**Form of proposal for Transfer of Management*)

*Form - 1*

| Sr.No. | Item | Details |
|---|---|---|
| 1. | Name of Management, Address and Phone No. | |
| 2. | Registration number and date of registration of Management | |
| 3. | Name(s) of the affiliated College recognized Institution of which transfer of management is sought, Address and Phone No. | |
| 4. | Academic Year from which transfer of management is sought. | |
| 5. | Existing Faculties, courses, subjects and divisions | |
| 6. | Yearwise number of students admitted to the courses under each Faculty. | |
| 7. | Existing infrastructure, which includes class-rooms, office, laboratories, library, sports facility etc. along with the details such as numbers, area and other necessary specifications, if any. | |
| 8. | Financial position of the existing affiliated colleges / recognized institutions, along with audit reports of last three financial years.<br>(a) moveable property<br>(b) Immoveable property<br>(c) Bank Deposits<br>(d) Loans | |
| 9. | Justification for taking over the management of the affiliated college/ recognized institution. | |
| 10. | Number of litigations pending before any court of law/authority, along with its details. | |
| 11. | Number and date of Resolution passed by the Management regarding taking over of the affiliated college / recognized institution, run by the other Management. | |

Chairman

Name :

Stamp

Secretary

Name :

Stamp

*Form - 2*

| Sr. No. | Item | Details |
|---|---|---|
| 1. | Name of Management, Address and Phone No. | |
| 2. | Registration number and date of registration of Management | |
| 3. | Name(s) of the affiliated College/recognized Institutions of management Address and Phone No. | |
| 4. | Academic Year from which transfer of management is sought. | |
| 5. | Existing Faculties, courses, subjects and divisions | |
| 6. | Yearwise number of students admitted to the courses under each Faculty. | |

| Sr. No. | Item | Details |
|---|---|---|
| 7. | (a) Existing infrastructure: which includes class-rooms, office, laboratories, library, sports facility etc. along with the details such as numbers, area and other necessary specifications, if any. | |
| | (b) Additional Infrastructure: To accommodate students, teachers and other staff of the affiliated college / recognized institution to be taken over, along with the details such as number, area and other specifications, if any. | |
| 8. | Financial position of the affiliated colleges / recognized institution of which transfer of management is sought, along with audit reports of last three financial years.<br>(a) Moveable property<br>(b) Immoveable property<br>(c) Bank Deposits<br>(d) Loans | |
| 9. | Details of payment of fees paid to the University for transfer of management of the affiliated college / recognized institution. | |
| 10. | Justification for transfer of management of the affiliated college / recognized institution. | |
| 11. | Number of litigations pending before any court of law / authority, along with its details. | |
| 12. | Number and date of Resolution passed by the Management regarding transfer of management of the affiliated college / recognized institution. | |

Chairman

Name :

Stamp

Secretary

Name :

Stamp

By order and in the name of the Governor of Maharashtra,

AJIT BAWISKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.